# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक १७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २७/७/२०२१** रोजी **सकाळी ११:०० (अकरा)** वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला,** पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे **भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. ५६९

अनधिकृत होर्डींग, बोर्ड, बॅनर, फ्लेक्स इ. वरील माहे जून २०२१ चा मासिक निष्कासन कारवाई अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/३५३ दि.१९/७/२०२१ चे पत्र.

### सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स

विषय क्र. ५७०

सन २०२०-२१ मुद्रण टेंडर क्र. ४ मनपा मुद्रणालयासाठी ६१ सें.मी. (२४'')=६० जीएसएम व ७६ सें.मी. (३०'') = ६० जीएसएम पांढरा क्रिमवोव्ह रिळ पेपर तसेच ६१ सें.मी. (२४'')=७० जीएसएम व ७६ सें.मी. (३०'')= ७० जीएसएम क्लासिक मॅपलिथो रिळ पेपर खरेदी करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.पटेल पेपर कंपनी यांचे एकच टेंडर आले (टेंडर र.रु.५२,९४,८००/- पेक्षा ३.७८०% जादा) असल्याने त्यांचेकडून र.रु.५४,९४,९४३=४४ पर्यंत खरेदी करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मुद्रणालय विभाग/३६० दि.२०/७/२०२१ चे पत्र.

### टेंडर न मागविता

विषय क्र. ५७१

पुणे महानगरपालिकेचे अधिकारी व पदाधिकारी यांचे दैनंदिन शासकीय कामकाजासाठी ३८ नग टाटा नेक्सॉन वाहन चालकासहीत इलेक्ट्रिक व्हेईकल (EV) ८ वर्षे कालावधीसाठी मे. एनर्जी ईफिसिएन्सी सर्व्हिसेस लि. (EESL) यांचेकडून वाहने ८ वर्षे कालावधीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अन्वये र.रु.२३,२८,८८,०४६.४० (अक्षरी र.रु. तेवीस कोटी अठ्ठावीस लाख अठ्याऐंशी हजार सेहेचाळीस रु. चाळीस पैसे फक्त) पर्यंत जीएसटी व सर्व खर्चासह पर्यंत भाडेतत्वावर घेणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मोवावि/३५७ दि.१९/७/२०२१ चे पत्र.

१) पुणे महानगरपालिकेच्या अधिकारी व पदाधिकारी यांच्या दैनंदिन वापरात असलेली एकूण ३८ इतकी वाहने मे. एनर्जी ईफिसिएन्सी सर्व्हिसेस लि. (EESL) यांचेकडून भाडेतत्वावर घेणेस...

२) मे. एनर्जी ईफिसिएन्सी सर्व्हिसेस लि. (EESL) यांचेकडून भाडेतत्वावर ३८ नग टाटा नेक्सॉन वाहने चालकासहीत ८ वर्षे कालावधीसाठी आवश्यकतेनुसार त्यांचे अटी व शर्ती स्विकारुन रक्कम रु.२३,२८,८८,०४६.४० (जीएसटी व सर्व खर्चासह) पर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ५ कलम (२) (२) अन्वये घेणेकामी मान्यता मिळणेस...

३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७२ मधील ब नुसार सन २०२१-२२ हे आर्थिक वर्ष संपल्यानंतर देखील खर्च होणार असल्याने अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यापूर्वी महानगरपालिकेची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेकडे रक्कम रु.२१,९५,८४,२४६.४० (जीएसटी व सर्व खर्चासह) इतक्या रक्कमेचे दायित्व येणार असल्याने विषयपत्र मंजुरीसाठी सादर करणेस...

४) मे. एनर्जी ईफिसिएन्सी सर्व्हिसेस लि. (EESL) यांचे बरोबरचा करार संपुष्टात आल्यानंतर त्यांनी पुरविलेल्या भाडेतत्वावरील वाहनांच्या एमआरपी किंमतीच्या ५% रक्कम मे. एनर्जी ईफिसिएन्सी सर्व्हिसेस लि. (EESL) यांना अदा करुन वाहने पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस...

मागील सभेचे विषय

विषय क्र. ५७२

मा.सौ.वर्षा साठे यांचे दि. १९/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.३७ अ मध्ये कोविड-१९ संदर्भात र.रु.४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये समाज मंदिर,बुद्ध विहार सांस्कृतिक हॉल येथे दुरूस्ती विषयक कामे करणे. (CE22A704/SJ20-1336) | १० लक्ष | - |
| २. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये अप्पर,सुपर,२७६ ओटा व विविध ठिकाणी कॉंक्रिटीकरण करणे. (CE20A1262/SA15-1420) | १५ लक्ष | - |
| ३. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये महेश खडके वस्ती येथे ड्रेनेज विषयक कामे करणे. (ZE16B102/SD2-1779) | ०५ लक्ष | - |
| ४. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये दुर्गामाता गार्डन मधील विषयक कामे करणे व खेळणी बसविणे. (CE26A336/SU1-1551) | १० लक्ष | - |
| | नविन सुचविलेली कामे- | | |
| १. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये ॲम्ब्युलन्स ऑक्सिजन युक्त खरेदी करणे. | - | २५ लक्ष |
| २. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये पुर्ण प्रभागामध्ये सॅनिटायझर जेटिंग मशिनच्या सहाय्याने करणे | - | ०३ लक्ष |
| ३. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये गल्ली बोळ सॅनिटायझर करण्यासाठी पंप हॅंड खरेदी करणे | - | ०३ लक्ष |
| ४. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये सॅनिटायझर बॉटल व मास्क वाटप करणे | - | ०३ लक्ष |
| ५. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये दैनंदिन स्वच्छ विषयक कामे करणे. | - | ०३ लक्ष |
| ६. | प्रभाग क्र. ३७ अ मध्ये ऑक्सीजन कन्सटेंटर मशीन खरेदी करणे. | - | ०३ लक्ष |

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५७३

मा.दत्तात्रय धनकवडे यांचे दि. २०/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.३८ अ बिबवेवाडी स.नं.६५९ पार्ट राजीवगांधीनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहाची सिमाभिंत बांधणे व उर्वरित कामे करणे करीता र.रू.२० लाखाचे खालील प्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक स यादी पान क्र.२६७,<br>१.बजेट कोड नं. CE26A336/SU1-1505, प्रभाग क्र.३८ अ बालाजीनगर-राजीवगांधीनगर मध्ये पुण्याईनगर येथील नाल्याच्या कडेने अस्तित्वात असलेले नाला गार्डनचे दुरूस्ती व सुशोभिकरण करणे. | १० लाख | - |
| २.बजेट कोड नं. CE26A336/SU1-1506, प्रभाग क्र.३८ अ बालाजीनगर-राजीवगांधीनगर मध्ये काशिनाथ पाटील नगर येथील नाल्याच्या कडेने अस्तित्वात असलेले नाला गार्डनचे दुरूस्ती व सुशोभिकरण करणे. | १० लाख | - |

| नविन सुचविलेली कामे- | | |
|---|---|---|
| प्रभाग क्र.३८ अ बिबवेवाडी स.नं.६५९ पार्ट राजीवगांधीनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहाची सिमाभिंत बांधणे व उर्वरित कामे करणे. | - | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५७४

मा.अमोल बालवडकर यांचे दि. ९/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सीई२७ए२४१/एसजे२४-९६४, प्रभाग क्र.०९ क बालेवाडी स.नं.१५ कम्फर्ट झोन सोसायटी नजीक नव्याने विकसित करण्यात आलेल्या क्रीडांगणामध्ये उर्वरित विकासकामे करणे - भाग १ | २० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणे | -- | २० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५७५

मा.अमोल बालवडकर यांचे दि. ९/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणेसाठी र.रु.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सीई२७ए२४१/एसजे२४-९६६, प्रभाग क्र.०९ क बालेवाडी स.नं.१५ कम्फर्ट झोन सोसायटी नजीक नव्याने विकसित करण्यात आलेल्या क्रीडांगणामध्ये उर्वरित विकासकामे करणे - भाग २ | ३० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणे | -- | ३० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५७६

मा.अमोल बालवडकर यांचे दि. ९/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सीई२७ए२४१/एसजे२४-९६७, बालेवाडी स.नं.३३ ओरवी सोसायटी नजीक नव्याने विकसित झालेल्या क्रीडांगणमध्ये उर्वरित विकसित कामे करणे - भाग २ | २० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणे | -- | २० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५७७

मा.अमोल बालवडकर यांचे दि. ९/४/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सीई२७ए२४१/एसजे२४-९६७, बालेवाडी स.नं.३३ ओरवी सोसायटी नजीक नव्याने विकसित झालेल्या क्रीडांगणमध्ये उर्वरित विकसित कामे करणे – भाग १ | २० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.०९ मुंबई-बेंगलोर हायवे NH4 लगत सर्व्हिस रस्त्याच्या बाजूने उद्यान विषयक सुशोभिकरण करणे | -- | २० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०21 च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५७८

मा.किशोर धनकवडे यांचे दि. ४/३/२०२१ चे पत्र.

गाव मौजे आंबेगाव बु.ाा तालुका हवेली, जिल्हा पुणे येथील स.नं. २५/६/२अ, स.नं. २५/६/३, स.नं. २५/६/४, स.नं. २५/६/५, स.नं. २५/६/६, स.नं. २५/८, स.नं. २५/९/६, स.नं. २५/९/७, स.नं. २५/९/१०, स.नं. २५/९/१२, स.नं. २५/९/१७ येथील कनेक्टीविटी मिळणेसाठी अस्तित्वातील ९ मीटर रस्ता रुंद करुन २१० प्रमाणे पुर्व पश्चिम रस्ता प्रस्तावित करावा.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०21 च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५७९

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील हातगाडी वाल्यावंर कारवाई होते व त्यांना रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) मा.मुख्य सभा ठराव क्र. ७११ दि.२०/१२/२०१७ अन्वये अतिक्रमण कारवाईत जप्त हातगाडी सोडणेकरिता मान्य झालेले रिमुव्हल चार्जेस रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार) रद्द करुन त्याऐवजी रुपये १,०००/- (रुपये एक हजार) रिमुव्हल चार्जेस आकारुन हातगाडया सोडणेबाबत मा.सौ.सुजाता शेट्टी, मा.सौ.पल्लवी जावळे, मा.सौ.अश्विनी कदम, मा.सौ.वैशाली मराठे, मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.अविनाश बागवे, मा.श्रीमती लता राजगुरु, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.लक्ष्मी दुधाने, मा.सौ.दिपाली धुमाळ, मा.आबा बागुल, मा.सौ.हेमलता मगर, मा.सौ.सुमन पठारे, मा.वनराज आंदेकर, मा.अशोक कांबळे, मा.सौ.नंदा लोणकर, मा.सौ.पुजा कोद्रे, मा.प्रिया गदादे, मा.अजित दरेकर यांचे दि. २०/६/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ३१३ दि. ४/७/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/अतिक्रमण/१९५ दि.३/८/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०21 च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५८०

पुणे मनपा प्रशासनाने शहरातील बहुतांशी जाहिरात फलकांना चुकीच्या पद्धतीने परवानगी व नुतनीकरणे दिलेले आहे. सदर परवानगी व नुतनीकरण दिलेले जाहिरातफलक प्रत्यक्षात जागेवर रस्त्यापासून १.५ मी. अंतराच्या आतमध्ये, जमिनीपासून ४० फुटांपेक्षा अधिक उंचीवर, नाले व नदीपात्रात तसेच पदपथ व रस्त्यावर देखील उभे केलेले आहेत. सदरील जाहिरातफलक हे प्रचलित कायद्याचा अनादर करणारे असून नागरिकांच्या जीवाच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहेत. सदर बाब संबंधित परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा. उपायुक्त, मा. क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरिक्षक यांना ज्ञात असूनही प्रशासकीय निष्क्रियतेमुळे सदरील जाहिरातफलकांवर प्रत्यक्षात कारवाई होताना दिसत नाही. प्रशासनाने सदरील कायद्याचा अनादर करणा-या व धोकादायक जाहिरातफलकांवर १५ दिवसात कारवाई न केल्यास भविष्यात दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचा मृत्यु झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित जाहिरातदार, परवाना व आकाशचिन्ह विभागाचे मा.उपायुक्त, मा.क्षेत्रिय अधिकारी व मा. क्षेत्रिय परवाना निरीक्षक यांचेवर निश्चित करण्यात यावी याबाबत मा.रफिक शेख व मा.सौ.राजश्री काळे यांचे दि. २६/७/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ६३९ दि. ६/८/२०१९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/परवाना व आकाशचिन्ह/६३८ दि.१४/१०/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०21 च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५८१**

पुणे महानगरपालिकेकडून जाहिरात फलक परवानगी व नूतनीकरण दिलेल्या सर्व जाहिरात फलक धारकांकडून परवानगीच्या दिनांकापासून ते आजपर्यंत व्यावसायिक दराने कर आकारणी करण्याबाबत मा.सौ.चाँदबी नदाफ, मा.सौ.राजश्री काळे व मा.सौ.वैशाली मराठे यांचे दि.१६/८/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ९६१ दि. २८/८/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/७८६ दि.६/१२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५८२**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.प्रमोद ओसवाल व मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.१३/३/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि. २०/३/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६३ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५८३**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.बाळा ओसवाल व मा.योगेश ससाणे यांचे दि.२७/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १४२३ दि. २८/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६४ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५८४**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे व मा.मुक्तारी अलगुडे यांचे दि.१५/९/२०१५ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ११४७ दि. १५/९/२०१५ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६५ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५८५**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि.१४/२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २१९३ दि. २०/२/२०१८ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६६ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५८६**

परवाना व आकाशचिन्ह विभागाशी संबंधित विषयाबाबत मा.अविनाश बागवे, मा.सौ.वैशाली मराठे, मा.अभिजित कदम, मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. १२/३/२०१३ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६५४ दि. १९/३/२०१३ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६७ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५८७**

इमारतीचे साईड फ्रंट मार्जिन जाहिरात फलकांबाबत मा.अविनाश बागवे व मा.प्रिया गदादे यांचे दि.१३/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३१३ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/एल/३६८ दि.४/८/२०१८ ने पाठविलेला फेरअभिप्राय विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५८८

जाहिरात फलक संदर्भातील सर्व कामे परवाना व आकाशचिन्ह विभागामार्फत करून परवानगी व कारवाईचे सर्व अधिकार परवाना व आकाशचिन्ह विभागाचे प्रमुखांना देण्याबाबत मा.सौ.छाया मारणे यांचे दि. २४/१२/२०१९ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १९४३ दि. ३१/१२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/आकाशचिन्ह.पर./१०६० दि.७/२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५८९

पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या कार्यक्रमांच्या व्यतिरिक्त नागरिक/खाजगी/सरकारी/निमसरकारी संस्था/मंडळे/मा.सभासद/लोकप्रतिनिधी इत्यादीकडून त्यांचे खाजगी कार्यक्रमांसाठी तात्पुरत्या स्वरुपासाठी सजावटीकरीता त्यांचेकडून लेखी मागणी आल्यास कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम यांचे दरात खालीलप्रमाणे वाढ करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१४१ दि.२९/६/२०२० चे पत्र.

| अ.क्र. | तपशील | प्रचलित दर (र.रु.) | प्रस्तावित दर (र.रु.) |
|---|---|---|---|
| १) | पुणे महानगरपालिका उद्यान विभागामार्फत भाडयाने देण्यात येणाऱ्या कुंडयाचे भाडे व अनामत रक्कम | भाडे – र.रु.१/– प्रतिकुंडी<br>अनामत – र.रु. १०/– | भाडे – र.रु.१००/– प्रतिकुंडी/प्रतीदिन<br>अनामत रक्कम र.रु. ३००/– प्रतीकुंडी |

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५९०

पुणे महानगरपालिकेच्या उद्यानांचे प्रवेशशुल्कामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्ठ क्र. १ मधील अ.क्र. १ ते १३ उद्यानांचे सद्य:स्थितीत असलेले प्रचलित प्रवेशशुल्क वाढवून उद्यानांचे प्रवेश शुल्क प्रस्तावित दरांप्रमाणे प्रौढांसाठी र.रु.१०/– व लहान मुलांसाठी र.रु. ५/–, मासिक पास र.रु. २००/– व विदेशी नागरिक र.रु. १००/– दैनंदिन तिकीट या प्रमाणे आकारणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उदयान/१४२ दि.२९/६/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५९१

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उआ(वि)स्मार्ट सिटी/१०४० दि.२३/३/२०२१ चे पत्र.

१. स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा ४६ कोटी ऐवजी उपलब्ध तरतुदीनुसार र. रू. ४० कोटी इतका हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेस
2. पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे नावे धनादेश काढणेस
3. पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दयावयाची रक्कम खालील अर्थशिर्षकातून अदा करणेस

सन २०२०-२१

अर्थशिर्षक FE50A104 स्मार्ट सिटी अभियान अंतर्गत सुरू होणाऱ्या प्रकल्पांसाठी (केंद्रशासन व राज्यशासन अनुदानासहित) तरतुद र.रू. ४० कोटी

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. २५/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५९२

पुणे पेठ शिवाजीनगर डेक्कन जिमखाना प्लॉट नं.७५९/५ ही पुणे महानगरपालिकेने भाडेतत्वावर घेतलेली मिळकत शाळेची इमारत धोकादायक झालेली असल्याने बंद आहे. यास्तव सदर मिळकत मूळ मालक ट्रस्टी डेक्कन जिमखाना यांना परत करणेस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माल.व्यव/१०१८,दि,२२/०३/२१ रोजीचे पत्रावर झालेला शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.१८६,दि.२६.०३.२०२१ विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार १ महिन्यानी करावा असे दि. २२/६/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५९३

पुणे महानगरपालिकेच्या कै.शिवशंकर पोटे दवाखानाकरीता खरेदी करण्यात आलेल्य 3.0 Tesla MRI मशिनचे सीएमसी चार्जेस सिमेन्स हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड यांना रक्कम रू.१,२३,३६,९००/- (अक्षरी र.रू. एक कोटी तेवीस लाख छत्तीस हजार नउशे फक्त) अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३०९ दि. ५/७/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १९/७/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

विषय क्र. ५९४

वडगाव (नवले पुल) ते कात्रज चौक या दरम्यानच्या राष्ट्रीय महामार्ग क्रं. ५४८ डी.डी. च्या रुंदीकरणाच्या कामामध्ये येणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या मलनिःसारण वाहिन्या स्थलांतरित करणे या कामासाठी र.रु. ७,४८,७९,८६२/- इतकी रक्कम पुणे मनपाच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षातील मंजूर अंदाजपत्रकामधील पुणे मनपा हद्दीमधील नव्याने समाविष्ठ गावामध्ये मास्टर प्लाननुसार ड्रेनेज लाईन विकसित करणे व मैलापाणी शुध्दीकरण केंद्र उभारणे र.रु. ६३.०० कोटी या मधून राष्ट्रीय महामार्ग विभाग(सा.बां.) यांचेकडे अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मलनि:/३५५ दि. १९/७/२०२१ चे पत्र.

शिवाजी दौंडकर<br>
नगरसचिव,<br>
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्‌भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअ‍ॅप द्वारे कळविण्यात येईल.